# जालना शहर महानगरपालिका.

## संगणक विभाग

जा.क्र./जाशम/संगणक/निविदा/ ०५/२०२६ दि. ०२/०२ /२०२६

---

दरपत्रक

जालना शहर महानगरपालिकेमध्ये कर्मचारी उपस्थितीचे प्रत्यक्ष वेळेत (Real-Time) निरीक्षण करण्यासाठी **फेशियल रेकग्निशन तंत्रज्ञान** व GPS **लोकेशन-आधारित सत्यापन** वापरणारा ॲन्ड्रॉइड व IOS मोबाइल-आधारित ॲप्प/सॉफ्टवेअर पुरवठा करण्यास पात्र कंपन्यांकडून मुद्रांकित/सिलबंद निविदा/ दरत्रक मागविण्यात येत आहे.

कोरी निविदा/ दरपत्रक दिनांक ०३ /०२/२०२६ ते दि. ११ /०२ /२०२६ रोजी दु. २.०० वा कालावधीत कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म रक्कम नगदी स्वरुपात भरणा करुन खरेदी करता उपलब्ध असेल.

प्राप्त निविदा / दरपत्रक दि. ११ /०२/२०२६ रोजी दु. ३.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा शुल्क | निविदा ईसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | करार कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जालना शहर महानगरपालिकेमध्ये कर्मचारी उपस्थितीचे प्रत्यक्ष वेळेत (Real-Time) निरीक्षण करण्यासाठी **फेशियल रेकग्निशन तंत्रज्ञान** व GPS **लोकेशन-आधारित सत्यापन** वापरणारा ॲन्ड्रॉइड व IOS मोबाइल-आधारित ॲप्प/सॉफ्टवेअर पुरवठा करणे. | ५९०/- रोख | १०,०००/-चा आयुक्त जालना शहर महानगरपालिका नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. | ३० दिवस | आदेशापासुन एक वर्ष |

<u>अटी व शर्ती</u>

१. निविदा धारकांनी त्यांच्या निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. तांत्रिक लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ (दराचा लिफाफा) स्वतंत्रपणे दोन वेगवेगळ्या लिफाफ्या मध्ये सादर करणे आवश्यक राहील.
२. निविदा फॉर्म फीस व निविदा अनामत रक्कम याची सत्यप्रत लिफाफा क्रमांक ०१ मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.
३. प्राप्त निविदापैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचे अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.
४. या निविदेसूचनेतील अटी व शर्ती निविदा फॉर्मच्या अटी शर्ती अंतर्भूत राहतील.

५. निविदा करिता आवश्यक असलेले खालील कागदपत्रे यांची सत्य प्रत लिफाफा क्रमांक ०१ मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.
   १. संस्था/फर्म नोंदणी प्रमाणपत्र,
   २. पॅनकार्ड आणि GST प्रमाणपत्र ,आयकर भरलेबाबतची प्रमाणपत्र.
   ३. किमान ३ वर्षांचा सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट/IT सेवा पुरवठ्याचा अनुभव असणे आवश्यक.
   ४. फेशियल रेकग्निशन व Geo-Fencing Enabled लोकेशन-ट्रॅकिंग आधारित मोबाइल ॲप विकसित/पुरवठा केलेला अनुभव असावा.
   ५. कंपनी भारतीय कायद्याखाली नोंदणीकृत असावी (Udyam/MSME/GST/PAN आवश्यक).
   ६. मागील दोन वर्षांचे ऑडिटेड आर्थिक अहवाल सादर करणे आवश्यक.
   ७. निविदाधारकाच्या स्वाक्षरीसहीत निविदा फॉर्म.
   ८. निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे.
६. निविदेतील दर हे GST व इतर करासह साहित्य पुरवठा करून दुरुस्ती करून देणेचे आहे.
७. ज्याची निविदा मंजूर होईल त्यास योग्य त्या रकमेचा स्टॅम्प पेपर वर स्वखर्चाने मुदतीचा करारनामा करून द्यावा लागेल..
८. मंजुर निविदाधारकास १% ईसारा रक्कम निविदा सादर करतेवेळेस व २% बयाणा रक्कम करारनामा सादर करतेवेळेस तसेच उर्वरित ७% सुरक्षा अनामत रक्कम व लागु असलेल्या शासकीय कपाती चालु बिलातुन कपात करणेत येईल.
९. सदर एकुण रक्कम सदर कामाचे लेखापरीक्षण झालेनंतर परत करणेत येईल.
१०. निविदा प्राप्त झाल्यावर त्या संबधी कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
११. निविदाधाराकांनी स्वत:हून कोणताही अट व शर्त घातल्यास निविदेचा विचार केला जाणार नाही.
१२. शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता निविदा धारकास निविदा मंजुर झालेनंतर करावी लागेल.
१३. निविदा संबधीचा कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास इसारा रक्कम जप्त करण्याचा अधिकार जालना महानगरपालिका , जालना यांना राहील.
१४. आवश्यक वाटल्यास निविदा भरण्यापूर्वी निविदाची संपूर्ण माहिती घ्यावी नंतर कसलीही तक्रार चालणार नाही.
१५. निविदेत नमूद केलेले काम ठरवुन दिलेल्या स्पेसिफिकेशन नुसार पुरविणे बंधनकारक राहील.
१६. लेखा परीक्षणामध्ये काही त्रृटी आक्षेप दूर करावयाच्या दृष्टीने रीतसर जबाबदारी निविदाधारकावर राहील.
१७. कार्यादेश दिल्यानंतर विहित मुदतीत काम पुर्ण करणे बंधनकारक राहील.
१८. महानगरपालिका निधिच्या उपलब्धतेनुसार बिलाची अदायगी करण्यात येईल.
१९. निविदेबाबत कोणतीही मार्गदर्शक सुचना शुद्धीपत्रक अथवा इतर माहीती व निविदा फॉम या कार्यालयात पहावयास व विक्रीसाठी उपलब्ध आहे.

वरील नियम व अटी मी/ आम्ही वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत. .

## तांत्रिक वैशिष्ट्ये (Technical Specifications)

A) मोबाइल अनुप्रयोग

१. Android आणि iOS दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असावा.
२. Fast & Secure Login: Username/Password + वैकल्पिक OTP.
३. उपस्थिती नोंदणी करताना Live फेस-व्हेरिफिकेशन (फेशियल लिव्हनेस डिटेक्शन आवश्यक).
४. कर्मचारी ज्याठिकाणी उपस्थिती नोंदवतो त्या ठिकाणाचे GPS coordinates स्वयंचलितरीत्या कॅप्चर होणे.
५. ऑफलाइन मोड उपलब्ध (इंटरनेट उपलब्ध झाल्यावर डेटा Sync होणे).
६. कर्मचारी प्रोफाइल, डेली लॉग, लीव्ह रिक्वेस्ट इत्यादी सुविधा.
७. ज्या कर्मचा-याकडे स्मार्टफोन नसेल त्या कर्मचा-याची हजेरी त्याच्या विभाग प्रमुख/ वरिष्ठाच्या फोन मधुन घेता येण्याची सुविधा असावी.

B) ॲडमिन पोर्टल / वेब डॅशबोर्ड

१. रिअल-टाइम उपस्थिती मॉनिटरिंग.
२. Attendance Report § Daily / Monthly / Department-wise.
३. GPS लोकेशन Tracking Map View.
४. कर्मचारी व्यवस्थापन, रोल-ॲक्सेस कंट्रोल.
५. डेटा एक्सपोर्ट (Excel, PDF).
६. पे-रोल प्रणाली

C) फेशियल रेकग्निशन वैशिष्ट्ये

१. ≥ ९५% Accuracy.
२. लिव्हनेस डिटेक्शन (फोटो/व्हिडिओ स्पूफिंग टाळण्यासाठी).
३. १-सेकंदात ओळख (Near Real-time).

D) डेटा सुरक्षा

१. डेटा एन्क्रिप्शन (AES-२५६ / SSL).
२. क्लाउड सर्व्हर भारतीय लोकेशनमध्ये असावा (ISO २७००१ प्रमाणित).
३. वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती डेटा संरक्षण कायद्यानुसार सुरक्षित ठेवणे.

३. सेवा / सपोर्ट अटी

१. किमान १ **वर्षाचे मोफत तांत्रिक समर्थन** (AMC) **तसेच** अपडेट्स व बग-फिक्स द्यावे.
२. २४—७ Helpdesk / Ticket Support उपलब्ध असावा.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (कपिल धुळे) | (अर्जुन गिराम) |
| **नगर अभियंता (संगणक)** | **अतिरिक्त आयुक्त** |
| **जालना शहर महानगरपालिका** | **जालना शहर महानगरपालिका** |

## परिशिष्ट - अ
## प्रतिज्ञा पत्र

मी --------------------------------------------------------- वय ------ वर्षे राहणार ------------- ---------------------------- सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी ------------------------ या कंपणीचा प्रोप्रायटर / भागीदार असून मी ---------------------------------------------------------------- ---- या कामासाठी ई-निविदा सादर केली आहे. सदर निविदेसोबत कागदपत्रे सादर केली आहेत. सदर कागदपत्रे सत्य, बरोबर व परिपूर्ण आहेत. सदर कागदपत्रामध्ये त्रुटी किंवा चुका नाहीत असे शपथपुर्ण मान्य करत आहे. याकागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व अपूर्ण माहिती आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

निविदाधारकाचे नाव : ..........................................................................

पत्ता : ..............................................................................................

दिनांक .- निविदाधारकाची सही...........

साक्षीदाराचे नाव : ...............................................................................

पत्ता : ...............................................................................................

दिनांक.- साक्षीदाराची सही..................

<u>परिशिष्ट - ब</u>

<u>प्रतिज्ञा पत्र</u>

मी /आम्ही याद्वारे असे नमुद करतो कि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) (फ) व कलम ११ (ड) तरतुदीच्या , ज्या खाली उद्धृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभीरपणे नमुद करतो कि, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधीन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदे मध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा अर्थिक हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

**कलम १० (१) (फ):-** पोट कलम (२) च्या तरतूदीच्या अधिन राहुन तिचा महानगरपालिके बरोबर, महानगर पालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्य कोणत्याही करारात किंवा महानगरपालिकेच्या नोकरीत तिचा स्वताःचा किंवा तिच्या भागीदाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हित संबंध असेल.

**कलम ११ (ड):-** ज्या बाबतीत त्यांच्या स्वताःचा किंवा आपल्या भागीदारा मार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कलम १० पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये वर्णन केल्या प्रमाणे असलेला कोणताही भाग किंवा ज्या बाबतीत त्याचा पक्षकाराच्या, प्रकर्त्याच्या किंवा अन्य व्यक्तींच्या वतीने व्यवसाय दृष्ट्या हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी चर्चा चालु असतांना त्यावेळी मत देवुन किंवा तीत भाग घेऊन किंवा अशा बाबी संबंधी कोणताही प्रश्न विचारुन महानगरपालिकेचा सदस्य किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य या नात्याने काम करील तर, त्याचे पालिका सदस्य म्हणुन पद धारण करणे बंद होईल.

निविदाधारकाचे नाव :...........................................................................

पत्ता :...............................................................................................

दिनांक :-                                        निविदाधारकाची सही...........

साक्षीदाराचे नाव : ............................................................................

पत्ता  : ..............................................................................................

दिनांक.-                                        साक्षीदाराची सही....................